'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 197(B) : Emerging Innovative Trends in Higher Education
ISSN : 2348-7143
September-2019

## अनक्रमणिका


| अ.क्र. | शीर्षक | लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 1 | भारतातील शेतकरी आत्महत्याची कारणे व उपाय | प्रा.तानाजी नरवाडे | 07 |
| 2 | मानवाधिकार आणि शिक्षण व्यवस्था | प्रा.एस.एन.ठाकरे व प्रा.नासीर शेख | 11 |
| 3 | कृषी विकासाची शाश्वत योजना | डॉ.रमेश बिडवाई | 15 |
| 4 | लोकशाही बळकटीकरणाच्या प्रक्रीयेत शिक्षणाची भूमिका | डॉ.योगेश उगले | 21 |
| 5 | महाराष्ट्रातील मानवी विकासामध्ये शिक्षणाचे योगदान | डॉ.माधवराव बिरादार | 25 |
| 6 | लोकशाहीच्या सक्षमीकरणात शिक्षणाची भूमिका | डॉ.संतोष बनसोड | 30 |
| 7 | उच्च शिक्षणातील व अभिनव कल एक अंतविषयक दृष्टीकोन | डॉ.पुनम राणे | 35 |
| 8 | भारतीय अर्थव्यवस्थेत कृषीची भूमिका | प्रा.विलास चव्हाण | 41 |
| 9 | उत्कृष्ट प्रशासनाची प्राचीन भारताच्या इतिहासाची भूमिका | डॉ.वाय.एस.माहुरे | 45 |
| 10 | नांदेड जिल्ह्यातील स्वायत्त व संलग्नीत महाविद्यालयांच्या प्रवेश अभ्यासक्रम व मूल्यमापन प्रक्रियांचा तूलनात्मक अभ्यास | ए.पी.गिणगिणे व एस.आर.लखमावाड | 47 |
| 11 | भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीची भूमिका | प्रा.वृशाल ठाकरे | 50 |
| 12 | राष्ट्रीय विकासात शिक्षणाचे योगदान व शैक्षणिक स्थिती | प्रा.मनीषा कीर्तने | 54 |
| 13 | मानवाधिकाराच्या अंमलबजावणीत शिक्षणाची भूमिका | प्रा.विजय तिरपुडे | 57 |
| 14 | शेतकरी आत्महत्या : कारणे व उपाय | प्रा.जयश्री काळे | 61 |
| 15 | भारतातील शेतकरी आत्महत्या : कारणे व उपाययोजना | प्रा.आनंद राऊत | 66 |
| 16 | लोकशाही बळकट करण्यात शिक्षणाची भूमिका | प्रा.प्रदिप एडके | 71 |
| 17 | शेतकरी आत्महत्या : एक समाजशास्त्रीय अध्ययन विशेष संदर्भ वाशिम जिल्हा | डॉ.दिपक दामोदर | 75 |
| 18 | २१ व्या शतकातील शेतकऱ्यांची विवंचना | डॉ.मुक्ता बिरादार | 79 |
| 19 | भारतातील उच्च शिक्षणाची वर्तमान स्थिती (संदर्भ – उच्च व तंत्र शिक्षण विभाग – महाराष्ट्र राज्य) | डॉ.जयमाला लाडे | 82 |
| 20 | भारतीय अर्थव्यवस्थेत कृषीचे महत्त्व | डॉ.विठ्ठल घिनमिने | 88 |
| 21 | मानवी जीवन मूल्यांच्या प्रचार,प्रसारात 'धग' कादंबरीची भूमिका | प्रा.पुरुषोत्तम निर्मळ | 94 |
| 22 | भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राची भूमिका | डॉ.मुरलीधर इंगोले | 98 |
| 23 | बाबाराव मुसळे यांच्या 'पाखल'कादंबरीवर जागतिकीकरणाचा पडलेला प्रभाव | डॉ.ज्ञानेश्वर कदम | 103 |
| 24 | मंगला गोडबोले यांचे विनोदी लेखन | कु.पल्लवी कोकाटे | 106 |
| 25 | भारतीय अर्थव्यवस्थेतील शेती क्षेत्राची भूमिका | पंढरी गोरे | 111 |
| 26 | लोकशाही बळकट करण्यासाठी शिक्षणाची भूमिका | डॉ.आम्रपाली मोंढे | 117 |
| 27 | भारतीय कृषी क्षेत्राचे भारतीय अर्थव्यवस्थेतील योगदान | डॉ.चंद्रकांत गजेवाड | 121 |
| 28 | भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीची भूमिका | भगवान देवसकर | 125 |
| 29 | उपेक्षित भटक्या विमुक्तांचे राष्ट्रनिर्मितीत योगदान | डॉ.डी.एस.पवार | 129 |
| 30 | लोकशाही सशक्तीकरणामध्ये शिक्षणाची भूमिका | डॉ.किरण पाईकराव | 132 |
| 31 | लोकशाहीच्या दृढिकरणामध्ये शिक्षणाचे योगदान : एक अभ्यास | कु.चित्रलेखा मोरे | 136 |
| 32 | लोकशाहीच्या सशक्तीकरणात शिक्षणाची भूमिका | डॉ.अशोक इंगोले | 140 |
| 33 | शिक्षणाची गुणवत्ता आणि शिक्षक : एक अभ्यास | स्वामी गुरप्पा | 143 |
| 34 | शिक्षणातून पर्यावरण साक्षरता – एक अभियान | डॉ.लता वाघेला | 147 |

# महाराष्ट्रातील मानवी विकासामध्ये शिक्षणाचे योगदान

प्रा.डॉ.माधवराव नरसिंगराव बिरादार
सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,
दिगंबरराव बिंदू महाविद्यालय, भोकर जि.नांदेड
भ्रमणध्वनी 9421768439
E-mail-drmadhavbiradar65@gmail.com

**प्रस्तावना :**

आर्थिक विकास प्रक्रियेत मानव हा घटक सर्वाधिक महत्वाचा आहे. त्यामुळे मानव विकासाची संकल्पना आर्थिक विकासात अग्रगण्य मानली जाते. अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य व शिक्षण या जीवनावश्यक गरजा व्यवस्थित पणे भागविण्यासाठी केलेले प्रयत्न व त्याची प्रत्यक्ष पूर्तता यातील समन्वय म्हणजेच मानवी विकास होयं. मानव विकासामध्ये शिक्षणाचा अतिशय महत्वाचा कार्यभाग आहे. शिक्षण जास्त तर मानवी विकास जास्त, याउलट शिक्षण कमी तर मानवी विकास कमी असतो. अमर्त्य सेन यांनी शिक्षण व मानवी विकास यांच्यातील धनात्मक संबंधाबाबत भूमिका मांडली. मानवी विकास शिक्षणाच्या प्रचार व प्रसारामुळे होतो आणि मानवी विकासामुळे राष्ट्राच्या आर्थिक विकासाला चालना मिळते असे स्पष्ट केले. कारण देशाचा आर्थिक विकास देशातील लोकसंख्येच्या आकारावर अवलंबून नसतो तर लोकसंख्येच्या गुणवत्तेवर अवलंबून असतो. लोकसंख्या दीर्घायूषी, शिक्षित, प्रशिक्षित, अनुभवी, कार्यक्षम व कुशल असेल तर लोकसंख्येची गुणवत्ता चांगली आहे असे समजण्यात येते. चांगल्या गुणवत्तेच्या मनुष्यबळामुळे आर्थिक विकासाचा वेग वाढण्यास मदत होते. अशी लोकसंख्या नैसर्गिक व वित्तीय साधनसामग्री प्रमाणे उपयुक्त मानली जाते.

मानवाच्या सर्वांगिण विकासाचे प्रभावी साधन म्हणजे शिक्षण होय. शिक्षण हे विविध उपयोगी प्रक्रिया आहे. शिक्षणात औपचारीक शिक्षण (शालेय व महाविद्यालय) व संस्कार, प्रशिक्षण-विशिष्ट व्यावसायीक/कामगार यांना सहेतुक दिलेले शिक्षण, मानवी विकासासाठी आवश्यक असलेला बौध्दीक, भावनात्मक, शारीरिक विकासाला चालना देवू शकतो. शिक्षण हे मानवाच्या स्वतःच्या विकासाचे आणि पर्यायाने राष्ट्रीय विकासाचे एक प्रभावी माध्यम आहे. त्यामुळेच शिक्षणावर केलेला खर्च ही एक दीर्घकालीन अधिक परतावा देणारी गुंतवणूक मानली जाते. शिवाय शैक्षणिक प्रगती, सामाजिक सक्षमीकरणाची महत्वपूर्ण प्रक्रिया आहे. शिक्षणामुळे मानवाच्या जाणीवा रुदांवतात त्यामुळे मानवी विकासामध्ये शिक्षणाची भूमिका महत्वाची आहे. शिक्षण-प्रशिक्षण आणि संशोधनाचा प्रत्येक टप्पा व्यक्तिच्या संधीचा विस्तार, कला, कौशल्य आणि कार्यक्षमतेत वाढ घडवून आणणारा घटक ठरतो. देशातील उपलब्ध शिक्षण पध्दती, शैक्षणिक गुणवत्ता, व्यावसायीकता यावर आर्थिक व मानवी विकासाचा दर अवलंबून असतो. प्रस्तुत शोधनिबंधात महाराष्ट्रातील शिक्षणाची सद्य स्थितीत व मानवी विकासामध्ये शिक्षणाचे योगदान यावर प्रकाश टाकलेला आहे.

**असा हा महाराष्ट्र :-**

महाराष्ट्रा राज्याची स्थापना १ मे १९६० रोजी झाली असून महाराष्ट्र मराठी भाषेच्या सूत्राने एकत्र बांधलेले भारतातील एक प्रगत राज्य आहे. भारतातील लोकसंख्येच्या दृष्टिने दुसरे राज्य, क्षेत्रफळाच्या दृष्टिने महाराष्ट्राचा देशात तिसरा क्रमांक असून राज्याचे भौगोलिक क्षेत्रफळ ३,०७,७१३ चौरस कि.मी. आहे. भारताच्या एकुण भौगोलिक क्षेत्रफळापैकी ९.३६ टक्क्याहून अधिक क्षेत्रफळ महाराष्ट्राने व्यापलेला आहे. सध्या

महाराष्ट्रात ३६ जिल्हे असून ३५५ तहसिल व ४०,६५६ वस्ती असलेली गावे आहेत. २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची लोकसंख्या ११.२३ कोटी असून भारतातील श्रीमंत राज्यापैकी एक असलेल्या महाराष्ट्रातील दरडोई उत्पन्न राष्ट्रीय उत्पन्नापेक्षा अधिक आहे. यातील बहुतेक उत्पन्न हे कारखानदारी व सेवा क्षेत्रातून मिळतो. राज्यातील ४५.२३ टक्के लोकसंख्या शहरी भागात राहते व राज्यातील साक्षरतेचा दर ८२.३ टक्के असून त्यात स्त्री साक्षरतेचा दर ७५.६ टक्के तर पुरुष साक्षरतेचा दर ८८.४ टक्के इतका होता.

**१९६० पूर्वी महाराष्ट्रातील मानवी विकास व शिक्षण**

१९ व्या शतकाच्या सुरुवातीपासूनच सामाजिक स्तरावर स्वयंस्फुर्तीने आणि वैयक्ति प्रेरणेने शिक्षण विस्तारासाठी महाराष्ट्रात प्रयत्न झालेले आहेत. राज्यांत आधुनिक शिक्षणाची सुरुवात प्रथमतः मिशनऱ्यांनी केली. सन १८२१ मध्ये पुणे येथे शासनाने संस्कृत कॉलेज सुरु केले. त्याचे ष्डेक्कन कॉलेजष असे नामकरण करण्यात आले. सन १८५५ साली मुंबई इलाक्यात शिक्षण खात्याची व १८५७ साली मुंबई विद्यापिठाची स्थापना झाली. मानवी विकास वाढविण्यासाठी स्त्रीयांच्या शिक्षणावर भर देणे आवश्यक आहे हे ओळखून महात्मा ज्योतीबा फुले यांनी १८४८ मध्ये स्त्रीयांसाठी पहिली शाळा सुरु केली. १८८० नंतरच्या राष्ट्रीय शिक्षणाच्या चळवळीत टिळक, आगरकर, चिपळूणकर व नामदार जोशी यांनी पुढाकार घेतला होता. २० व्या शतकामध्ये महर्षि धोंडो केशव कर्वे यांनी स्त्री शिक्षण व समाज सुधारणा याबाबत बहुमोल कार्य केले. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्था सुरु करुन व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी पिपल्स एज्युकेशन सोसायटी सुरु करुन शिक्षण प्रसार वाढविण्याचे कार्य केले. थोडक्यात १९६० च्या अगोदर पासूनच महाराष्ट्रात मानवी विकास वाढविण्याचे प्रयत्न केले असल्याचे दिसून येते.

**महाराष्ट्रात मानवी विकासात शिक्षणाची सद्यस्थिती :-**

महाराष्ट्रात १९६० पासून शिक्षणाच्या विकास व विस्तारासाठी करण्यात आलेल्या प्रयत्नामुळे प्राथमिक शिक्षणापासून पदवी व तांत्रिक शिक्षणापर्यंत शैक्षणिक संस्था, त्यातील विद्यार्थी व शिक्षक संख्येत मोठी वाढ झाली. परिणामी साक्षरता प्रमाणात झपाटयाने वाढ घडून आली. समाज व सर्वसमावेशक दर्जेदार शिक्षण हे शाश्वत विकासाचे शिक्षणविषयक लक्ष्य आहे. यास अनुसरुन ६ ते १४ वयोगटातील विद्यार्थ्यांना जवळच्या शाळेत मोफत व सक्तीचे शिक्षण प्राप्त करुन देणारा 'मोफत व सक्तीचे शिक्षणाचा अधिकार २००९ अधिनियमष १एप्रिल २०१० पासून लागू झाला आहे. महाराष्ट्रात सध्या उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात विशेषतः तांत्रीक व वैद्यकीय शिक्षण क्षेत्रातही बऱ्याचशा सुविधा निर्माण झाल्या आहेत. शालेय शिक्षण व उच्च शिक्षणाच्या सद्यस्थितीचे सविस्तर विश्लेषण पुढील प्रमाणे आहे.

**शालेय शिक्षण :-**

मूलभूत शिक्षण म्हणजेच प्राथमिक (१ ली ते ८ वी) हा शिक्षण पध्दतीच्या मनोऱ्यातील पाया असून सर्व शिक्षण अभियानाच्या माध्यमातून हा पाया राज्यात चांगल्या प्रकारे प्रस्थापित झाला आहे. ष्प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रीकरणष या कार्यक्रमानुसार विद्यार्थ्यांच्या राहत्या घरापासून १.५ कि.मी.च्या अंतरात शिक्षणाच्या सुविध उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. या धोरणाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टिने जिल्हा परिषदांना अनुदान वितरीत करण्यात येत आहे. मानवी विकास वाढवावयाचा असेल तर मूलभूत शिक्षणा बरोबरच माध्यमिक व उच्च माध्यमिक (९ वी ते १२ वी) शाळेची संख्या वाढविणे देखील महत्वाचे आहे. राज्यात प्राथमिक शिक्षण आणि माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण या दोन्ही प्रकारच्या शाळांची संख्या वाढविली जात आहे. शासकीय

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 197(B) : Emerging Innovative Trends in Higher Education
ISSN : 2348-7143
September-2019

संस्था बरोबरच खाजगी शिक्षण संस्था देखील आपआपल्या शाळा काढून शिक्षणाचा विस्तार वाढवित आहेत. यामध्ये अनेक शाळा विनाअनुदान तत्वावर चांगल्या पध्दतीने कार्यरत आहेत. पुढील तक्त्यावरुन शालेय शिक्षणाची प्रगती अधिक स्पष्ट होते.

तक्ता क्र. १ महाराष्ट्रातील शालेय शिक्षणाची सांख्यिकी (२०१८-१९)

| तपशिल | (प्राथमिक १ली ते ८वी) | माध्यमिक व उच्च माध्यमिक ( ९ वी ते १२ वी ) |
|---|---|---|
| संस्था (संख्या) | १०६५४६ | २६८५७ |
| पटसंख्या (हजारात) | १५६१२ | ६६४८ |
| पैकी मुली | ७४५१ | ३०४२ |
| शिक्षकांची संख्या (हजारात) | ५४२ | ६१६ |
| विद्यार्थी शिक्षक प्रमाण | २८.४ | ३०.५ |

आधार - महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१८-१९

वरील तक्त्यामधील आकडेवारी वरुन असे निदर्शनास येते की २०१८-१९ मध्ये राज्यात प्राथमिक शाळांची संख्या आणि माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांची संख्या अनुक्रमे १०६५४६ व २६८५७ इतकी होते. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची पटसंख्या व शिक्षकांची संख्या अनुक्रमे १५६१२ हजार व ५४२ हजार इतकी असून विद्यार्थी व शिक्षकाचे प्रमाण २८.४ आहे तर माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेमधील विद्यार्थी पटसंख्या ही ६६४८ हजार व शिक्षकांची संख्या ही २१६ हजार इतकी असून विद्यार्थी व शिक्षकाचे प्रमाण हे ३०.५ इतके आहे.

**उच्च व तंत्रशिक्षण :-**

राष्ट्रीय विकासाच्या प्रक्रियेत उच्च शिक्षण महत्वाची भुमिका बजावत असून सर्वसाधारण आर्थिक विकासास आवश्यक असलेले तांत्रिक व कुशल मनुष्यबळ निर्माण करते. मूलभूत शिक्षणाच्या सार्वत्रीकरण व्यतिरिक्त उच्च शिक्षणातील संधीचा देखील विस्तार करण्याची शासनाची भुमिका राहिलेली आहे. उच्च शिक्षणात सर्वसाधारण उच्चशिक्षणा बरोबरच कृषि, पशुवैद्यक, औषधनिर्माण शास्त्र, अभियांत्रिके, तांत्रिक व व्यावसायीक शिक्षण इत्यादीचा समावेश होतो. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१८-१९ मधील अखिल भारतीय उच्च शिक्षण पाहणी अहवाल २०१७-१८ नुसार राज्यात ५४ विद्यापीठे आहेत. त्यापैकी २७ राज्य विद्यापीठे (२२ सार्वजनिक, ४ खाजगी, १ मुक्त), २१ अभिमत विद्यापीठे (१२ खाजगी, ७ शासकीय व २ अनुदानीत), ५ राष्ट्रहिताच्या संस्था व १ केंद्रीय विद्यापीठ आहे. अखिल भारतीय उच्च शिक्षणाच्या पाहणीवर आधारीत उच्चशिक्षण विषयक सांख्यिकीय माहिती तक्ता क्र. २ मध्ये देण्यात आलेला आहे.

तक्ता क्र. २ महाराष्ट्रातील उच्च शिक्षणाची सांख्यिकी

| तपशिल | ३० सप्टेंबर २०१८ |
|---|---|
| विद्यापीठाची संख्या | ५४ |
| महाविद्यालयाची संख्या | ३४१४ |
| स्वायत संस्थांची संख्या | १५६० |
| उच्च शिक्षणातील पटसंख्या (लाखात) | ४१.३१ |
| स्त्रीयांची टक्केवारी | ४५.० |
| विद्यापीठातील व इतर संस्थातील पटसंख्या (लाखात) | ६.४३ |

| | |
|---|---|
| स्त्रीयांची टक्केवारी | ४६.६ |
| शिक्षकांची संख्या (लाखात) | १.५२ |
| शिक्षक-विद्यार्थी संख्या | २७ |

आधार : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१८-१९

**तांत्रीक शिक्षणः-**

सन १९८९ मध्ये रायगड जिल्हयात माणगाव तालुक्यात लोणेरे येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ स्थापन करण्यात आले असून अभियांत्रिकीय आणि उपयोजीत शास्त्रे यामधील प्रगत ज्ञानास उत्तेजन देण्याचे व या विषयासंदर्भात ज्ञान प्रचारास चालना देण्याचे कार्य या विद्यापीठाच्या माध्यमातून केले जाते. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१८-१९ मधील आंकडेवारीनुसार राज्यात तांत्रीक शिक्षण क्षेत्रात पदवीका, पदवी व पदव्युत्तर तीन्ही मिळून ६७७ अभियांत्रिके महाविद्यालय, १०३ स्थापत्यशास्त्र संस्था, ३२४ व्यवस्थापन शास्त्र संस्था, १९ हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान संस्था आणि ५५८ औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालय उच्च शिक्षणाची जबाबदारी पेलत आहेत. याशिवाय राज्यात ६४२ औद्योगिक प्रशिक्षण संस्था, तंत्रशिक्षण संस्था विद्यादानाचे कार्य करीत आहेत.

**वैद्यकीय शिक्षण संस्था :-**

महाराष्ट्र शासनाने सन १९९८ मध्ये नाशिक येथे महाराष्ट्र आरोग्यविज्ञान विद्यापीठाची स्थापना केली असून या विद्यापीठामार्फत राज्यातील वैद्यकीय शिक्षण व अनुषंगिक कार्य पार पाडले जातात. सध्या राज्यात शासकीय (विद्यापीठ व्यवस्थापनाखालील व महानगरपालिका महाविद्यालय धरुन), शासन अनुदानीत व विनाअनुदानीत तत्वावरील खाजगी महाविद्यालय अशी एकुण ३३३ महाविद्यालय वैद्यकीय शिक्षण देण्याचे कार्य करीत आहे. या महाविद्यालयात ३६ ॲलोपॅथी, ६६ आयुर्वेदीक, ४८ होमीओपेथीक, ६ युनानी, २६ दंतचिकित्सा, ३७ फिजीओथेरपी, ४ ऑक्युपेशनल, ६३ नर्सिंग या विविध प्रकाराच्या वैद्यकीय शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयाचा समावेश आहे.

**कृषि, पशु व मत्स्यविज्ञान शिक्षण संस्था :-**

राज्यात ४ कृषि विद्यापीठे असून या विद्यापीठामधून कृषि व संबंधीत विषयामधील पदवीका व पदवी अभ्यासक्रम चालविले जातात. या व्यतिरिक्त कृषि क्षेत्राशी संबंधीत संशोधन कार्यासही विद्यापीठे मोलाचे हातभार लावत आहेत. ४ कृषि विद्यापीठा शिवाय भारतातील तिसरे व महाराष्ट्रातील पहिले महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ ३ डिसेंबर २००० रोजी नागपूर येथे स्थापन केले आहे. कृषि, पशु व मत्स्यविज्ञान अभ्यासक्रमावरील शासकीय, शासन अनुदानीत व विनाअनुदानीत खाजगी पदवी व पदव्युत्तर मिळुन १०४ कृषि, २४ फलोत्पादन, ४ वनसंवर्धन, २ मत्स्यविज्ञान, २७ अन्न तंत्रज्ञान, २३ कृषि अभियांत्रिके, २ गृह/सामाजिक विज्ञान, १६ कृषि व्यवसाय व्यवस्थापन, ११ पशुविज्ञान शास्त्र, ३ दुग्ध तंत्रज्ञान आणि १ पशुसंवर्धन शास्त्र अशी एकुण २३६ महाविद्यालय कार्यरत आहेत.

**सर्वसाधारण शिक्षणसंस्थाः-**

यामध्ये कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षण अभ्यासक्रमाकरीता शिक्षण देणाऱ्या संस्थांचा समावेश होतो. सध्या राज्यात शासकीय अनुदानीत व विनाअनुदानीत कला, वाणिज्य व विज्ञान पदवी व पदव्युत्तर महाविद्यालयांची संख्या २३०६, विधी १२५ आणि शिक्षणशास्त्र ५४१ महाविद्यालय उच्च शिक्षण देण्याचे कार्य करीत आहेत.

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 197(B) : Emerging Innovative Trends in Higher Education
ISSN : 2348-7143
September-2019

**सारांश :-**

महाराष्ट्र राज्यामध्ये मानवी विकास वाढविण्यासाठी प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक तसेच सर्वसाधारण शिक्षणाबरोबरच कृषि, अभियांत्रीकी, तांत्रीक शिक्षण, वैद्यकीय शिक्षण संस्था आपल्या विविध शाखाद्वारे शिक्षण उपलब्ध करुन देत आहेत. त्यामुळे राज्यातील मानवी विकास वाढत असल्याचे दिसून येते. देशातील इतर राज्याच्या तुलनेत महाराष्ट्रामध्ये शिक्षणाचा प्रसार वेगाने वाढत आहे. वेगवेगळया प्रकारच्या शिक्षणसंस्था दरवर्षी नव्याने सुरु होत आहेत. तळागाळातील लोकापर्यंत शिक्षण पोहचविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने खास कार्यक्रम राबविले आहेत त्यामुळे गेल्या ५८ वर्षात राज्यात प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणपर्यंत सर्वच स्तरावर संस्था, विद्यार्थी, शिक्षक, क्रीडांगणे, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, संरक्षक भिंती इत्यादी भौतिक सुविधामध्ये मोठी लक्षणीय वाढ झालेली आहे. महाराष्ट्र शासनाच्या पुढाकाराचा एकत्रित परिणाम म्हणून राज्यांत साक्षरतेचे प्रमाण प्रत्येक दशकात वाढत गेले आहे. १९६१ ते २०११ या काळात साक्षरता प्रमाणात झालेल्या वाढीवरुन शैक्षणिक विकासाचे चित्र स्पष्ट होते. ५० वर्षात साक्षरता प्रमाण ३५ टक्के वरुन ८२.३ टक्के पर्यत वाढले आहे. स्त्री साक्षरता प्रमाण १६ टक्क्यावरुन ७५.९ टक्के पर्यत तर पुरुष साक्षरतेचे प्रमाण ४२ टक्क्यावरुन ८८.४ टक्के पर्यत वाढले आहेत. देशाच्या तुलनेत महाराष्ट्रातील साक्षरता प्रमाण अधिक आहे. साक्षरतेमध्ये झालेल्या वाढीचा परिणाम म्हणून जात, धर्म, लिंग आणि प्रादेशिक भेदभाव कमी करण्यास मदतच झाली आहे. शिवाय लोकसंख्या नियंत्रण, बालमृत्यू दरावर ताबा, आरोग्य संवर्धन, आयुमर्यादित वाढ होण्यास शिक्षण साहय्यभूत ठरले आहेत. असे जरी असले तरी आज शिक्षण क्षेत्राला अनेक समस्या भेडसावत आहेत. यामध्ये अतिरिक्त अथवा अपूरी विद्यार्थी संख्या, अपूरी शिक्षक संख्या, शिक्षकाची उदासीनता, खाजगी संस्थांचे वाढते प्रमाण व त्यांच्याकडून आकारली जाणारे भरमसाठ फी, आवश्यकतेपेक्षा जास्त शाळांना मान्यता, कायम विनाअनुदानीत संस्थांची वाढती संख्या, अतिरिक्त संस्थांमुळे अभियांत्रीकी सारख्या शाखांच्या जागांचे शिल्लक राहणे, पुरेसा प्रशिक्षित प्राध्यापक वर्ग नसणे, प्रभारी प्राचार्या करवी महाविद्यालयाचा कारभार हाकणे, इत्यादी समस्याने ग्रासले गेले आहे. याची गंभीर दखल घेवून शासनाने आवश्यक पावले उचलणे आवश्यक आहे. अन्यथा या समस्यांनी उग्र स्वरुप धारण केल्यास त्या सोडविणे शासनाच्या आवाक्या बाहेरचे होवून बसेल आणि याचा अनिष्ठ परिणाम राज्यातील मानवी विकासावर होईल हे निश्चित.

**संदर्भ सूची :-**

१. डालचंद्र बागडी, भारतीय अर्थव्यवस्था, अर्जुन पब्लिशींग हाऊस, नवी दिल्ली (२००४)
२. डॉ.के.के.शर्मा/डॉ.के.के.पठाण/डॉ.व्हि.एम.मांगले, संदर्भ महाराष्ट्र, अनुपम मुद्रण भोपाळ (२००४)
३. डॉ.माधव बिरादार, महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, विद्याबुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद (२०१८)
४. लोकराज्य सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्र विशेषांक एप्रिल-मे २०१०
५. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१८-१९, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. अर्थविश्व, मराठी अर्थशास्त्र परिषद राष्ट्रीय अधिवेशन स्मरणिका नोव्हेंबर २०१४ व नोव्हेंबर २०११.
7- Maharashtra Development Report, Planning Commission, Govt. of India, Academic Foundation New Delhi 2007